# कर्जतमध्ये वृद्धाचा तर नगरमध्ये तरुणीचा बळी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** नगर शहरासह दक्षिण जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने अक्षरशः धुमाकुळ सुरू केला आहे. या पावसामुळे शेती पिकांसह नागरिकांच्या घरांचे नुकसान होताना दिसत आहे. सोमवारी रात्री ते मंगळवारी सायंकाळपर्यंत दोघांचा पावसामुळे बळी गेला असून, यात नगर शहरात एका १८ वर्षीय तरुणीचा आणि कर्जतमध्ये ६३ वर्षीय वृद्धाचा समावेश आहे. दरम्यान, नगरच्या कापड बाजारात एका इमारतीचा काही भाग पावसाने कोसळला.

## नगरच्या कापड बाजारात इमारतीचा भाग कोसळला

मंगळवारी नगर शहरात दुपारी १२ च्या सुमारास मुसळधार पाऊस सुरू झाला. या पावसात सारसनगर भागातील एका बंगल्याचा स्लॅब कोसळून १८ वर्षीय तनवी रासने हिचा मृत्यू झाला. तनवी दुचाकीवरून घरी आली आणि गाडी लावून घरात प्रवेश करत असताना पोर्चचा स्लॅब कोसळला व ती जागीच ठार झाली. यावेळी नागरिक व मनपा आपत्कालीन विभागातील कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांनी तनवीचा मृतदेह बाहेर काढला. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये शोककळा पसरली होती. याचबरोबर सीना नदीला आलेल्या पुरामुळे बुरडगावचा संपर्क तुटला होता. याचबरोबर कल्याण राष्ट्रीय महामार्ग दिवसभर बंद होता. जोराच्या पावसामुळे ठिकठिकाणी नागरिकांच्या घरात पाणी घुसले होते. तसेच कर्जत तालुक्यातील हजीबा मोहन सुपेकर (रा. खेड, ता. कर्जत) यांची घराची भिंत कोसळून त्यात सुपेकर यांचा मृत्यू झाला. सोमवारी जिल्हा प्रशासनाकडील आकडेवारीनुसार जिल्ह्यात एकाच दिवशी सर्वाधिक पाऊस खेड या ठिकाणी १३६ मिलीमीटर झाल्याची नोंद झाली आहे.

## काँग्रेसच्या तिरंगा यात्रेद्वारे सैन्याचे कौतुक

**सिन्नर (प्रतिनिधी)–** तालुका काँग्रेस कमिटीकडून शहरात तिरंगा यात्रा काढून पहलगाम हल्ल्यात शहीद झालेल्या निष्पाप भारतीय नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर राबवत आपल्या शहिदांचा बदला घेतल्याबद्दल भारतीय सैन्याचे तिन्ही दलाचे अभिनंदन व कौतुक करण्यात आले.

भारताचे माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या स्म ृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

# रामकृष्ण आश्रमात त्रिदिनी कीर्तन महोत्सवास प्रारंभ

**नेवासा (शहर प्रतिनिधी)–** नेवासा तालुक्यातील गोणेगाव चौफुला येथील रामकृष्ण आश्रमामध्ये संस्थापक वै. रामकृष्ण महाराज काळे यांच्या पुण्यतिथी रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने आश्रमाचे भगवान महाराज जंगले यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारपासून त्रिदिनी कीर्तन महोत्सवाला उत्साहात प्रारंभ करण्यात आला.



देविदास महाराज म्हस्के म्हणाले की, मनाच्या वाणीच्या पलीकडचे संत तत्व असून संतांचे महत्व कळणे दुर्लभ आहे, देवाचे पुण्य लाभते तेव्हाच संत संगती लाभते, संतांच्या नाम उच्चाराने अशुभाचा नाश होऊन जीवन मंगल बनते. देवच संतांच्या रुपाने जगाच्या उद्धारासाठी भूतलावर अवतार घेतात ते आपल्याला पोटात घेतात म्हणून ते कृपावंतही असतात असा संदेश देत संतांच्या संगतीत राहून मनुष्य जीवाचा उद्धार करा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कीर्तन सोहळयाच्या प्रसंगी भगवान महाराज जंगले शास्त्री, ऋषिकेश महाराज वाकचौरे, रामनाथ महाराज मगर, गहिनीनाथ महाराज आढाव, भगवान महाराज चोळके, परशुराम महाराज घावटे, अंजाबापू महाराज कर्डीले, ज्ञानेश्वर महाराज शिंदे, राम महाराज खरवंडीकर, सुखद महाराज जाधव, बाळकृष्ण महाराज कुलकर्णी, नामदेव महाराज कंक, निलेश महाराज रोडे, ऋषिकेश महाराज वाल्हेकर, सागर महाराज, बदाम पठाडे, शेषराव जगताप, शिवाजी जाधव, कैलास जाधव यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वैकुंठवाशी रामकृष्ण महाराज काळे गुरूजींच्या २५ व्या रौप्य महोत्सवी पुण्यतिथी सोहळयाच्या निमित्ताने भगवान महाराज जंगले यांच्या मार्गदर्शनाखाली आळंदी येथील सुखद महाराज जाधव हे बालसंस्कार शिबिरात बाल वारकऱ्यांना गायन व मृदुंग वादनाचे प्रशिक्षण देत आहे. शेकडो बाल वारकरी या शिबिरात सहभागी झालेले आहेत.

# सोनई कृषी महाविद्यालयाच्या १८ विद्यार्थ्यांची परिसर मुलाखतीत निवड



**सोनई (वार्ताहर)–** मुळा एज्युकेशनच्या कृषि महाविद्यालय सोनईच्या चतुर्थ वर्षाच्या १८ विद्यार्थ्यांची इमार्टिक्स लर्निंग कंपनी अंतर्गत झालेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवड झाल्याची माहिती कंपनीचे राज्य प्रमुख ज्ञानेश खोत आणि व्यवस्थापक हेमंत जगताप यांनी दिली.

सदरच्या इंटरव्ह्यूसाठी महाविद्यालयाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे अधिकारी डॉ.अविनाश काकडे यांनी कष्ट घेतले.

इंटरव्ह्यूमध्ये महा-विद्यालयाच्या मानसी भडांगे, मानसी नवले, करूणा बच्छाव, ज्ञानेश हरिश्चंद्रे,निखिल तेलोरे, दीक्षा घोडके, अक्षदा महाकाळ, मोहिनी गुढधे, साक्षी फासाटे, निशिगंधा पवार, संचित दळे, प्रतिक वाघचौरे, आदित्य बानखेले, आकांक्षा मगर, गुणनिधी चव्हाण, ऋतुजा सोनुले, ओंकार वाबळे, सौरभ कोल्हापूरे यांची निवड झाली.

या निवडीबद्दल मुळाचे उपाध्यक्ष उदयन गडाख, सचिव उत्तमराव लोंढे, सहसचिव डॉ. विनायक देशमुख, प्राचार्य डॉ.हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनिल बोरुडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संदिप तांबे, डॉ. अविनाश काकडे, प्रा. प्रवीण इंगोले, प्रा. राहुल गोंधळी उपस्थित होते.

# पाटोळे प्राथमिक शाळेचा वर्धापन दिन साजरा

**सिन्नर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील पाटोळे येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या १११ व्या वर्धापन दिनानिमित्त शतकोत्तर एकादश वर्ष महोत्सव नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. या विशेष सोहळ्याचे अध्यक्षस्थान मेहसाणा महानगरपालिकेचे आयुक्त आणि शाळेचे म ाजी विद्यार्थी रविंद्र खताळे यांनी भूषवले.

शाळेच्या १११ वर्षांच्या गौरवशाली इतिहासाचा मागोवा घेत मुख्याध्यापक वसंत गोसावी यांनी प्रास्ताविकातून उपस्थितांचे स्वागत केले व आगामी वर्षातील विविध उपक्रमांची माहिती दिली. शाळेच्या मूळ इमारतीचे भूमिपूजन २६ मे १९१४ रोजी गुरुवर्य सोनोपंत तथा मामासाहेब दांडेकर यांच्या हस्ते झाले होते. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ महेश खताळे यांनी शाळेस दांडेकर मामांची प्रतिमा भेट दिली. शतकोत्तर एकादश वर्षानिमित्त तयार करण्यात आलेल्या शाळेच्या नवीन बोधचिन्हाचे, ङ्गप्रज्वलितो ज्ञानमय प्रदीपःफ्वे अनावरण करण्यात आले. यावेळी दिव्यांची आकर्षक आरास, केक कापण्याचा सोहळा आणि दिपप्रज्वलन यांसारखे विशेष उपक्रम पार पडले. आयुक्त रविंद्र खताळे यांनी आपल्या मनोगतातून, या शाळेच्या संस्कारांमुळेच मी घडलो असे सांगून शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव सोबत राहण्याचे आश्वासन दिले. त्यांनी सरकारी शाळांचे महत्व अधोरेखित करत, येथे केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे तर मूल्यशिक्षण व संस्कारही दिले जातात, असे आवर्जुन सांगितले. माजी सरपंच सोपान खताळे व मेघराज आव्हाड यांनी शाळेच्या प्रगतीसाठी गावकरी एकजुटीने काम करत असल्याचे नमूद केले. संयोजन सुनिता बर्वे आणि प्रतिभा बैरागी यांनी केले.

# अठरा वर्षानंतर चांदेकसारे विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**सोनेवाडी (वार्ताहर)–** कोपरगाव तालुक्यातील चांदेकसारे येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये २००६/०७ मध्ये शिकणाऱ्या दहावीच्या बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला.



क्रीडा शिक्षक व्ही टी होन यांच्या भोवती माजी विद्यार्थी गोळा झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी सरांच्या परेडची आठवण जागी केली. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी अध्यक्ष व्ही टी होन, एस एस गोसावी, रावसाहेब जावळे, श्रीमती पवार, श्रीमती आमटे , श्रीमती गोसावी, शिवाजी होन, देवराव माकोणे, बाळासाहेब धिर्डे, माजी विद्यार्थी प्रशांत होन, राजू होन, किशोर पवार, सौरभ पवार, सागर खर्से, दसरत आल्हाट, विनायक होन, सोमनाथ काटकर ,विलास दहे, विलास ढामळे, सुरज जमदाडे, सुशील आहेर,राहुल कोळगे, संदिप भोसले, प्रविण गुरसळ , सलीम शेख ,प्रविण गुरसळ, ईश्वर जावळे , सचिन होन, कुणाल तुवर ,संग्राम दहे, संदिप बारसे , राहुल गुरसळ ,बाळासाहेब दहे, केशव बढे , गौरव गुरसळ, अमोल जगताप, पृथ्वीराज होन , सचिन ढमाले, प्रविण दहे, मोषिन सय्यद, महेन्द्र दगडु, संदिप बेर्डे, महेश गुरसळ, मिलिंद खरात, संतोष होन, चेतन होन, जगदिश होन, सचिन डांगे, सागर पुंगळ, मीना तुवर, सुवर्णा काळे, रुपाली सरोदे,अर्चना जाधव, माधुरी जाधव, सविता पगारे, अश्विनी शिंदे , स्वाती पवार, पल्लवी जगताप, सविता माकोने, शालिनी होन, ज्योती जावळे, अभिलाषा गुजर, वंदना जाधव, वालू बर्डे, वर्षा खरात, पल्लवी सातपुते, सुरुची शिंदे, कल्याणी जगताप, मनीषा होन, नीलिमा गुजर, शोभा होन, वैशाली दहे, मनीषा दहे, अश्विनी पवार, संध्या शिंदे, सारिका दहे, वर्षा गुरसळ, आशा होन, अनिता होन आदी उपस्थित होते. अठरा वर्षानंतर प्रथमच एकत्र आलेल्या या विद्यार्थ्यांनी एकमेकांच्या शाळेतील आठवणींना उजाळा दिला.

# पेण येथील सुहित जीवन ट्रस्टच्या एकलव्य प्रशिक्षण केंद्रास अनुदान

**रायगड–** रायगड जिल्ह्यातील पेण येथील सुहित जीवन ट्रस्ट संचलित एकलव्य व्यवसाय प्रशिक्षण केंद्र या मतिमंद प्रवर्गाच्या कार्यशाळेस ७५ अनिवासी विद्यार्थी संख्येस अनुदान तत्त्वाव मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. याशिवाय सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयातील आकृतीबंधानुसार शिक्षक तसेच शिक्षकेत्तर संवर्गाची एकूण १४ पदे अनुज्ञेय होत असल्याने त्यासाठी येणाऱ्या ५८ लाख ३७ हजार ९०८ रूपयांच्या दरवर्षीच्या खर्चासही मंजुरी देण्यात आली.

**इचलकरंजी, जालना महापालिकेला अनुक्रमे ६५७ कोटी, ३९२ कोटी**

इचलकरंजी, जालना या नव्याने निर्माण करण्यात आलेल्या महानगरपालिकांना वस्तू आणि सेवाकर भरपाईपोटी अनुदान देण्यास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे पुढील पाच वर्षात इचलकरंजी महानगरपालिकेस ६५७ कोटी तर जालना महानगरपालिकेस ३९२ कोटी रूपयांचा निधी प्राप्त होईल.

महाराष्ट्र वस्तू आणि सेवाकर (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) अधिनियम, २०१७ नुसार इचलकरंजी, जालना महानगरपालिकेचा कलम ९ मधील परिशिष्टामध्ये समावेश करण्यासाठी मान्यता देण्यात आली. याच अधिनियमाच्या कलम ५ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार दोन्ही महानगरपालिकांसाठी आधारभूत वर्ष म्हणून सन २०२४-२५ निश्चित करण्यात आले. यानुसार पुढील पाच वर्षात दोन्ही महानगरपालिकांना एकूण १ हजार ४९ कोटी रुपये देण्यात येणार आहेत.

**महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प संस्थेवर पणन मंत्री पदसिध्द अध्यक्ष**

आशियाई विकास बँक सहाय्यित महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) या प्रकल्प संस्थेवर यापुढे राज्याचे पणन मंत्री पदसिध्द अध्यक्ष राहतील. तसेच प्रकल्पाच्या संनियंत्रणासाठी असलेल्या सुकाणू समितीचे अध्यक्ष मुख्य सचिवांऐवजी मुख्यमंत्री असतील, असा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यापूर्वी या संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष म्हणून विभागाचे सचिव काम पाहत होते. या निर्णयामुळे आता राज्याचे पणन मंत्री पदसिद्ध अध्यक्ष म्हणून काम पाहतील. तसेच मॅग्नेट प्रकल्प राबवणे आणि या प्रकल्पाच्या संनियंत्रणासाठी असलेल्या सुकाणू समितीच्या रचनेतही बदलास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सुकाणू समितीचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतील तर, उपाध्यक्षपदी पणन मंत्री आणि मुख्य सचिव हे सदस्य असतील.

**महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी**

महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाच्या नागपूर येथील सेवानिवृत्त आणि स्वेच्छानिवृत्त १९५ कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या कर्मचाऱ्यांच्या थकबाकी देण्याच्या मागणीबाबत जुलै २०२४ मध्ये बैठक झाली होती. त्यानंतर महामंडळाच्या संचालक मंडळाने डिसेंबर २०२४ मध्ये महामंडळाची आर्थिक स्थिती हलाखीची असल्याने या १९५ सेवानिवृत्त आणि स्वेच्छानिवृत्त कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी महामंडळाकडून देता येणार नसल्याने राज्य सरकारने विशेष बाब म्हणून सानुग्रह अनुदान म्हणून निधी उपलब्ध करून द्यावा, असा ठराव केला होता. त्यावर वस्त्रोद्योग आयुक्तालयाने थकबाकी देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाला मंत्रिमंडळाने विशेष बाब म्हणून मंजूरी दिली. या निर्णयामुळे या कर्मचाऱ्यांना १ एप्रिल २००६ ते २५ नोव्हेंबर २०१४ या कालावधीतील सहाव्या वेतन आयोगाच्या थकबाकीपोटी ११ कोटी ९० लाख ६९ हजार ४६३ रुपये विशेष बाब म्हणून दिले जाणार आहेत.

# ग्रामसभा न घेताच पोकरा समिती स्थापन

## ग्रामस्थांचा आरोप; तालुका कृषी अधिकाऱ्यांना दिले निवेदन

**वावी (वार्ताहर)–** ग्रामसभा न घेता परस्पर स्वत:च्या मर्जीतील सदस्यांना घेऊन पोकरा समिती स्थापन केल्याचा आरोप वावीच्या ग्रामस्थांनी केला असून त्वरीत ग्रामसभा घेऊन समितीच्या सदस्यांची निवड करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांना निवेदन देत केली आहे.

पोकरा समितीच्यावतीने शनिवारी (दि.२४) शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले होते. फेरी झाल्यानंतर आयोजीत बैठकीत समितीचे अध्यक्ष सरपंच विजय काटे यांनी समितीचे वाचन केल्यानंतर उपस्थित ग्रामस्थांनी या समितीवर आक्षेप घेतला. पोखरा अर्थात नानासाहेब देशम ुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या माध्यमातून केवळ शेतीवर अवलंबून न राहता शेतकऱ्यांना शेतीशी निगडित पूरक व्यवसाय करण्यास प्रोत्साहन देणे, मदतीसाठी मार्गदर्शन करणे, तंत्रज्ञान, अनुदान उपलब्ध करुन दिले जाते. जागतिक बँकेच्या अर्थ सहाय्याने सुरु केलला हा प्रकल्प राज्याच्या निवडक जिल्ह्यात राबविण्यात येणार असल्याची माहिती कृषी अधिकाऱ्यांनी दिली. सिन्नर तालुक्यातील काही गावांचा या प्रकल्पात समावेश करण्यात आला असून त्यासाठी स्थानिक पातळीवर कृषी ग्राम समिती स्थापन करण्याचे निर्देशदेखील देण्यात आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सरपंच विजय काटे व समितीच्या सचिव तथा ग्राम विकास अधिकारी अलका खिराडकर यांनी या योजनेसाठी कुठलीही ग्रामसभा न घेता केवळ चार भिंतीच्या आत स्वत:च्या निकटच्या सदस्यांना या समितीवर घेतल्याचा या बैठकीत ग्रामस्थांनी केला. ही समिती निवडण्यासाठी स्वतंत्र ग्रामसभा आयोजित करा व नवीन कृषी ग्राम समिती स्थापन करा अशी मागणी उपस्थित शेतकऱ्यांनी केली.

# सविता जावळे यांना आदर्श समाजसेविका पुरस्कार जाहीर

**सोनेवाडी (वार्ताहर)–** कोपरगाव तालुक्यातील सोनेवाडी येथील अंगणवाडी मदतनीस सविता जावळे यांच्या सामाजिक कार्याची दखल लेखक गोरक्षनाथ पवार यांच्या चमकणारे दिवे या पुस्तकात घेण्यात आली आहे. चमकणारे दिवे पुस्तक प्रकाशन अंधेरी पश्चिम मुंबई येथे होणार आहे. या सोहळ्यात आदर्श समाजसेविका म्हणून त्यांचा गौरव होणार आहे.



अंगणवाडी मदतनीस म्हणून त्या कार्यरत असून गरोदर महिला पासून तर अंगणवाडीत येणाऱ्या विशेषतः कुपोषित बालकांना सुदृढ करण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहे. दोन वर्षांपूर्वी सापडलेले साडेपाच तोळे सोने व्हाट्सअप वर फेसबुकच्या माध्यमातून तपास लावत ज्यांचे सोने आहे त्यांना परत केले. याच कार्याची दखल घेत कवी गोरक्षनाथ पवार यांनी चमकणारे दिवे पुस्तकात लेख देखील प्रसिद्ध केला. ज्येष्ठ पत्रकार अमोल भालेराव, कलाकार विजय पाटकर यांच्या हस्ते त्यांचा गौरव होणार आहे.

# योग शिक्षिका पूनम गांधी यांचे अपघाती निधन

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** शहरातील सुहास सुरेश गांधी यांच्या धर्मपत्नी, मेनरोड येथील सिया कम्युनिकेशनचे मालक सुशील गांधी यांच्या भावजयी व कु. सिया व चि. नक्ष गांधी यांच्या मातोश्री तसेच वडाळा महादेव येथील अजितदादा प ॉ लि ट े क्नि क कॉलेजच्या योग शिक्षिका सौ. पूनम सुहास गांधी (वय ४२) यांचे काल अपघाती निधन झाले.



सकाळी १० वाजता ओव्हरब्रीजजवळ अपघात झाला होता. अहिल्यानगर येथील साईदीप हॉस्पिटल येथे उपचार चालू असतानाच सायंकाळी ६ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांची अंत्ययात्रा आज बुधवार दि.२८ मे रोजी सकाळी १०.३० वाजता आर्चिड हाईट्स, सूर्यनगर, वॉर्ड नं. ७, श्रीरामपूर, येथील निवासस्थानापासून निघेल.त्यांच्या पश्चात सासू, पती, एक मुलगा, एक मुलगी, दीर, पुतणे असा परिवार आहे.

पान १ वरुन

## शेतजमीन वाटणीपत्राची दस्त...

शेतकऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना नाहक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे अशा दस्तांना नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे शेतकऱ्यांना वाटप पत्राची नोंदणी सहजपणे करता येईल.

## नगर-दौंड मार्ग ५० वर्षात प्रथमच बंद

या भागातील पूर्वा नदी आणि वालुंबा नदी या दोन्ही नद्यावरील बंधारे ओव्हरफ्लो झाले. घोसपुरी, सारोळा कासार, अस्तगाव येथील पावसामुळे पूर्वा नदीला तर पिंपळगाव कौडा आणि कामरगाव या गावातील पावसामुळे वालुंबा नदीला पुर आला. नगर-दौंड मार्गावर असणाऱ्या खडकी गावात या दोन्ही नद्यांचा संगम होतो. या दोन्ही नद्यांच्या पुराचे पाणी खडकी गावात शिरल्याने खडकीला पुराचा वेढा पडला. या दोन्ही नद्यांचे पात्र अर्धा किलोमीटर रुंद झाले. यामुळे सयाजी सुर्यभान कोठुळे, जगन्नाथ निकम आणि नंदाराम रोकडे यांच्या वस्तीत पुराचे पाणी घुसले. यात वस्तीमधील ८ ते १० जण अडकले. तालुका प्रशासनाला याची माहिती देण्यात आली.

दरम्यान, अविरत पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे नगर तालुक्यातील खडकी व वाळकी गावांमध्ये गंभीर पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. गावामध्ये पाण्याची पातळी कमरेपर्यंत पोहोचली असून रहिवासी अडकून पडले आहेत. हे गाव सैन्याच्या आर्मर्ड कॉर्प्स सेंटर अँड स्कूलपासून सुमारे २० किमी अंतरावर आहे. याठिकाणी लष्कराच्या वतीने मदत कार्य राबविण्यात येत आहे. यात खडकी येथून १० आणि वाळकी येथून १५ जणांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्याकडून मदतीची विनंती प्राप्त झाल्यानंतर भारतीय सैन्याने तात्काळ मदत पथक तैनात करून बचाव व मदत कार्य सुरू केले असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून देण्यात आली.

**५० वर्षांत प्रथमच दौंड रस्ता बंद**

खडकी गावाला पुराचा वेढा पडल्याने नगर-दौड मार्गावरील पुलावरून पाणी वाहू लागले. पाण्याचा प्रवाह आणि वेग जास्त असल्याने या मार्गावरील वाहतूक ५० वर्षांत प्रथमच बंद झाली आहे. तसेच अरणगाव-वाळकी मार्गावरही पुराचे पाणी घुसले होते.

## आंबित धरण ओव्हरफ्लो...

असणारे मुळा नदीवरील आंबित धरण असून अहमदनगर जिल्ह्यातील यावर्षीच्या पावसाळ्यात भरणारे आंबित धरण हे पहिले धरण आहे. मान्सून पूर्व दमदार एन्ट्रीने अकोले तालुक्यातील हे पहिले धरण भरले आहे.

## वाकी तलाव निम्मा

क्युसेकने कॅनालसाठी पाणी सोडण्यात येत आहे. वाकी तलावात हळुवार पाणी येत आहे. गतवर्षीचाच ४४ टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याने हे धरण यंदा लवकर निम्मे भरले आहे.

## कुकडी समूह धरणांमध्येही...

पिंपळगाव जोगा या पाच धरणांचा मिळून कुकडी प्रकल्प तयार झाला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून जिल्ह्यातील आंबेगाव, जुन्नर, शिरूर आणि अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर, श्रीगोंदा, कर्जत तसेच सोलापूर जिल्ह्यातील करमाळा अशा एकूण सात तालुक्यातील सुमारे १ लाख ५६ हजार २७८ हेक्टर एवढे क्षेत्र कालव्याद्वारे सिंचनाखाली आले आहे. कुकडी प्रकल्पावर या भागातील सर्व सिंचन प्रकल्प आणि पाणी योजना अवलंबून आहेत.

## मध्य महाराष्टात ११० टक्के...

पावसाची शक्यता आहे, असा अंदाज हवामान विभागाने दिला. हवामान विभागाचा मॉन्सून हंगामाचा सुधारित अंदाज काल हवामान विभागाचे महासंचालक मृत्यूंजय मोहपात्रा यांनी जाहीर केला. हवामान विभागाने मान्सून काळातील पावसाच्या अंदाजित टक्केवारित वाढ केली आहे.

एप्रिल महिन्याच्या अंदाजात १०५ टक्के पावसाचा अंदाज होता. सुधारित अंदाजात हवामान विभागाने जून ते स्पप्टेंबर म्हणजेच मान्सून काळात १०६ टक्क्यासंपेक्षा अधिक पावसाचा अंदाज दिला.